## अनुसूचित.जमातीच्या शेतक-यांना शेतीस पुरक व्यवसायासाठी पशुधन पुरवठा करणे अंतर्गत,शेळीगटाचा पुरवठा करणे 10+1

जिल्हा वार्षीक योजना (अनुसूचित जमाती) अनुसूचित जमातीच्या लाभार्थींना 10+1 शेळी गट वाटप करणे या योजनेअंतर्गत 10+1 शेळी गट वाटप केले जातात.

सदरील योजनेसाठी 1 शेळीची जास्तीत जास्त किंमत रू.8000/- व 01 बोकडाची किंमत रू.10000/- तर 10+1 शेळी गटासाठी 75 टक्के दराने शासन अनुदान रु.77659/-व लाभार्थी हिस्सा रु.25886/- असे एकुण रु.103545/- तिन वर्षासाठी 10+1 शेळी साठी 13545 रु.चा विमा काढणे अनिवार्य आहे.

अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची निवड खालील प्राधान्यंक्रमाणे करण्यात यावी.प्राधान्यक्रम उतरत्यां क्रमाने

1. दारिद्रयरेषेखालील लाभार्थी
2. अत्यल्पं भूधारक शेतकरी(1हेक्टंर पर्यतचे भूधारक)
3. अल्पं भूधारक शेतकरी (1 ते 2 हेक्टंर पर्यतचे भूधारक)
4. सुशिक्षित बेरोजगार(रोजगार व स्वंयंरोजगार केंद्रात नोंद असलेले)
5. महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्रं 1 ते 4 मधील)